पुणे जिल्हा परिषद, पुणे.
यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे - ४११ ००१.
शिक्षण विभाग (प्राथमिक)
Email- edupri.zppune@gmail.com | ssapune1@yahoo.co.in

कार्यालयीन नोंद वहीतील अ. क्र.: 164

## स्वमान्यता प्रमाणपत्र नमुना- 2

ई मान्यता ऑनलाईन अर्ज क्र. 2023266431334

दिनांक - 26/02/2024
27/02/2024

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/ मुख्याध्यापक,
V.H.B.P.Pandurang Kate Pratishthan संचलित PK International English School , Near Govind Garden, Pimple Saudagar, Pune-27

विषय :- बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम , 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम , 2011 याचा नियम 11, पोट नियम (4) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.

संदर्भ :- **संजय नाईकडे** , प्रशासन अधिकारी, **पिंपरी चिंचवड मनपा, पुणे** यांचा ऑनलाईन आर. टी. ई. निकष तपासणी अहवाल दिनांक 09/01/2024

आपल्या दिनांक 07/08/2023 च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेल्या पत्रव्यवहार शाळेची केलेली तपासणी याआधारे मी शिक्षणाधिकारी( प्राथमिक) पुणे जिल्हा परिषद पुणे दिनांक **1 April 2022 पासून 31 March 2025 पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता 1 ते 8 करिता V.H.B.P.Pandurang Kate Pratishthan संचलित PK International English School , Near Govind Garden, Pimple Saudagar, Pune-27 UDISE क्रमांक 27251902206 ( कायम विनाअनुदानित English माध्यम CBSE ) शाळेस तातुरती मान्यता देत आहे.**

वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
2. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, 2009 (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम, 2011 (जोडपत्र दोन) मधील तरतुदींचे शाळा पालन करील.
3. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
4. परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12 (2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
5. संस्था / शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल कारणार नाही आणि कोणत्याही छाननी पद्धतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पडणार नाही.
6. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी; धर्म, जात किंवा वंश, जन्मठिकाण किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.
7. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.
   (दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
   (तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.
   (चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.
   (पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करणेत येईल.
   (सहा) अधिनियमाच्या कलम 23 (1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की , अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम 24 (1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/ तिची कर्तव्ये शिक्षक पार पडतील, आणि
(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये याची सुनिश्चिती शाळा करील.

8. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील
9. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.
10. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या :-
    शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ: 4484 चौ.मी
    एकूण बांधकाम क्षेत्र: 520.25 चौ.मी
    खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ: 2322.56 चौ.मी
    वर्ग खोल्यांची संख्या :- 30 वर्ग खोल्या
    कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली :- 3 वर्ग खोल्या
    * मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल :-

| | मुले | मुली |
|---|---|---|
| संडास - | 13 | 13 |
| मुताऱ्या - | 42 | 13 |

    पिण्याच्या पाण्याची सुविधा आहे : yes
    दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयपाकघर : no
    * अध्यापन अध्ययन साहित्य खेळ व क्रीडाविषयक सामग्री ग्रथालय यांची उपलब्धता : yes
    * वाचन साहित्य विनासायास उपलब्ध : (**ग्रंथालय पुस्तक संख्या 3857**, नियतकालिका / वर्तमानपत्र संख्या 4 (**Lokmat, Sakal, Maharashtra Times, Pudhari**))
11. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.
12. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.
13. शाळा सोसायटी नोंदणी अधिनियम 1860 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.
14. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.
15. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरीक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात यावी.
16. तुमच्या शाळेला मिळालेला सकेतांक **UDISE No. 27251902206** असा आहे. हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.
17. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.
18. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही प्रलंबित बाब असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.
19. जोडपत्र "तीन" नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत
20. सदर प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने https://emanyatapune.org/ या संकेतस्थळावर आपण भरलेल्या माहितीच्या आधारे निर्गमित करण्यात आलेले आहे. सबब यात विसंगती दिसून आल्यास हे प्रमाणपत्र रद्द समजण्यात यावे.

( संध्या गायकवाड )
**शिक्षणाधिकारी प्राथमिक**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

**Chairman**
**VHBP Pandurang Kate Pratishthan**
**Pimple Saudagar, Pune -27**

**PRINCIPAL**
**P. K. International English School**
**Pimple Saudagar, Pune-411027**

पी. के. इंटरनॅशनल स्कूल, पिंपळे सौदागर, पुणे.

महाराष्ट्र शासन

क्रमांक- नाहप्र २०१३/(७५/१३)माशि-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ०२ ऑगस्ट, २०१३.

प्रति,

शिक्षण संचालक,
माध्यमिक व उच्च माध्यमिक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय :- सीबीएसई/आयसीएसई /आयबी / आयजीसीएसई इत्यादी देशातील व विदेशातील अभ्यासक्रमांशी संलग्नित होणा-या शाळांचे नाहरकत प्रमाणपत्राचे नुतनीकरण करण्याबाबत.

संदर्भ :- समक्रमांकाचे दि.१९ जून, २०१३ चे पत्र

वरील विषयावरील संदर्भाधीन पत्र कृपया पहावे.

२. संदर्भाधीन पत्रान्वये सीबीएसई/आयसीएसई /आयबी / आयजीसीएसई इत्यादी देशातील व विदेशातील अभ्यासक्रमांशी संलग्नित होणा-या शाळांच्या संदर्भातील मान्यता / ना-हरकत प्रमाणपत्र देण्याच्या अनुषंगाने करावयाच्य कार्यवाहीबाबतच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

उपरोक्त संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने येथे स्पष्ट करण्यात येते की, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ या अधिनियमांमधील तरतूदी विचारात घेता यापूर्वी शासनस्तरावरुन तात्पुरत्या व कायमस्वरुपी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेल्या व सद्य:स्थितीत शासन परवानगीशिवाय सुरु असलेल्या विवक्षित शाळा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मधील कलम १८ व १९ च्या अनुषंगाने विहित केलेले निकष, अटी व शर्तींची पूर्तता करीत असतील तर अशा शाळांना शासन स्तरावरुन परवानगी आहे असे गृहित धरुन मान्यता देण्याची कार्यवाही संबंधित जिल्हा शिक्षणाधिकारी यांच्या स्तरावरुन करण्याबाबतच्या

Scanned with OKEN Scanner

सूचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्यात. तसेच, त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा. जेणे करुन अशा शाळांना शासन स्तरावरुन ना हरकत प्रमाणपत्र देण्याची पुढील कार्यवाही करता येणे शक्य होईल.

(सु.न. जोशी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
नागपूर/अमरावती/नाशिक/पुणे/मुंबई/औरंगाबाद/कोल्हापूर
२. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), सर्व जिल्हा परिषदा
३. मा.मंत्री/राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
४. मा.अपर मुख्य सचिव यांचे स्वी.स.
५. निवडनस्ती/माशि-१

Scanned with OKEN Scanner